# भूपाळी

(श्री. रामचंद्र सीताराम देव यांनी गुरुपौर्णिमा ता. ६-७-१९२५ रोजी
सकाळी म्हटलेली स्वरचित भूपाळी)

उठा उठा सकळ जन । पाहूं चला साईचरण।
तुटोनि जाईल भवबंधन। भावें चरण पाहतांची ।।धृ. ।।
त्यांचे होतांची दर्शन। तृप्त होतील नयन।
भावें घालोनी लोटांगण। चरण तुम्ही वंदा ते ।।१ ।।
कोटी तीर्थे चरणांपाशीं । त्या चरणीं सद्भावेंसी।
नमुनी तुम्ही अहर्निशी।'जन्म मरण चुकवा कीं ।।२ ।।
रुप पाहतांची लोचनी। सुख होईल साजणी।
अज्ञान जाऊनि तत्क्षणीं। ज्ञानज्योति प्रगटेल ।।३ ।।
जपा 'साईनाथ' निर्धारी। नाम पावन चतुराक्षरी।
तेणें चुकूनी तुमची फेरी। मोक्षपद मिळेल कीं ।।४ ।।
परब्रह्म हें अवतरलें। म्हणूनि नाम तें पावले।
आतां जपा तेंची पहिलें। तुम्हा सुख व्हावया ।।५ ।।
साईनाम हाचि वन्ही। महत्पापें तीं तत्क्षणीं।
तृणवत टाकील जाळूनी। प्रातःकाळीं स्मरतांची ।।६ ।।
धर्मलोप बहू झाला । तेणें भूभार वाढला।
म्हणूनी समर्थ अवतरला। जड मूढ ताराया ।।७ ।।
प्रातःकाळीं दर्शन घेतां। मुक्ति मिळेल सायुज्यता।
तेणें चुकेल जन्मव्यथा। भावें दर्शन घेतांची ।।८ ।।
रुप सुंदर सुकुमार। दिसे अति मनोहर।
पाहून तेंचि सत्वर। कृतार्थ तुम्ही व्हाल कीं ।।९ ।।
सत्य सांगे सीतारामसुत। साई पाहा हो प्रेमयुक्त ।
तेणें व्हाल जन्ममुक्त । संदेह कांहीं असेना ।।१० ।।

(श्री साईलीला, शके १८४७, वर्ष ३, अंक ५, पृ. २४४)